NAAC Accredited-2022
'B++' Grade (CGPA 2.96)

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

**Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur**

केगाव, सोलापूर - ४१३ २५५, महाराष्ट्र (भारत)

दुरध्वनी क्र. ०२१७-२७४४७७१ / ७२/ ७३ (११ लाईन्स), फॅक्स : ०२१७-२३५१३००,
संकेतस्थळ: http://su.digitaluniversity.ac.in ई-मेल: fao.@sus.ac.in



## खरेदी व भांडार विभाग

जा.क्र. पुअहोसोविसो/विवले/खभांवि/२०२५/ 21 दिनांक: 4 JAN 2025

## परिपत्रक

विद्यापीठातील सर्व संकुलाचे प्रमुख, प्रशासकीय प्रमुख व संबंधितांना कळविण्यात येते की, प्रस्तुत विद्यापीठाकडील विविध संकुले व प्रशासकीय विभागाकडे असलेल्या शार्प कंपनीच्या झेरॉक्स/कॉपीयर मशिन वार्षिक देखभाल व दुरुस्ती करिता ***मे.आय.पी. एंटरप्रायझेस, सोलापूर*** या फर्मसोबत ***दि.०३/०१/२०२५ ते ०२/०१/२०२८*** या तीन वर्षाकरिता दर करार करण्यात आला आहे. सदर मशीनच्या देखभाल व दुरुस्ती करण्याकरिता खालील प्रमाणे दर राहतील.

| अ.क्र. | कंपनीचे नाव | दर | मशीनची संख्या | एकूण वार्षिक किंमत |
|---|---|---|---|---|
| १. | शार्प प्रति मशीन (लहान) | रु.९,०००/- +GST | १२ | रु.१,०८,०००/- +GST |
| २. | शार्प प्रति मशीन (मोठे) | रु. १४,०००/- +GST | ०८ | रु.१,१२,०००/- +GST |
| ३. | Warranty Period मध्ये असलेल्या ०२ मशीन | रु. १४,०००/- +GST | ०२ | रु. ४९,५६०/- GST सहित (तीन वर्षाकरिता) |

सर्व संकुले व प्रशासकीय विभाग प्रमुखांना आदेशान्वये सुचित करण्यात येते की, दरकरारातील अट क्र.८ नुसार दरमहा आपल्या विभागातील झेरॉक्स/कॉपीयर मशीनची सर्व्हिसिंग कंपनीकडून करुन घेणे आवश्यक आहे. तीन महिन्यानंतर फर्मने भेट देऊन केलेल्या कामाचा अहवाल सोबत जोडून आपल्या विभागाच्या सेवेबाबतचा अभिप्राय देऊन प्राप्त देयकास Accession & Allotment करुन व सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेवून तीन दिवसांत देयक आदायगीसाठी वित्त व लेखा विभागाकडे सादर करावे. तसेच उपरोक्त फर्मकडून शार्प कंपनीच्या झेरॉक्स/कॉपीयर मशिनची दुरुस्ती अथवा टोनर संपल्यास समान लेखा संहितानुसार सक्षम प्राधिकाऱ्यांची प्रशासकीय मान्यता घेवून सदर फर्मला पुरवठा आदेश देऊन काम पूर्ण करुन घ्यावे. दर कराराव्यतिरिक्त इतर फर्म कडून उपरोक्त काम केल्यास देयके पारीत करण्यात येणार नाहीत. याची नोंद घ्यावी.

(सीए. एम.एस. खराडे)
**वित्त व लेखा अधिकारी**

**सोबत: १. करारनाम्याची प्रत २. कार्यारंभ आदेशाची प्रत**

**फर्मचा पत्ता: -**

**मे. आय.पी. एंटरप्रायझेस,**
शॉप नं.६, शुभराय टॉवर, तळ मजला,
दत्त चौक, **सोलापूर.**
**मो. नं. ९८२२६२२९९२**

**प्रति,**

१. सर्व संकुले/प्रशासकीय विभाग
२. मा. कुलगुरु कार्यालय
३. मा. प्र. कुलगुरु कार्यालय
४. मा. कुलसचिव यांचे कार्यालय
५. वित्त व लेखा विभाग परिपत्रक नस्ती

NAAC Accredited-2015
'B++' Grade (CGPA 2.96)

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

**Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur**

केगाव, सोलापूर - ४१३ २५५, महाराष्ट्र (भारत)
दुरध्वनी क्र. ०२१७-२७४४७७१ / ७२/ ७३ (११ लाईन्स), फॅक्स : ०२१७-२३५१३००,
संकेतस्थळ: http://sus.ac.in ई-मेल: fao@sus.ac.in



**खरेदी व भांडार विभाग**

जा.क्र.पुअहोसोविसो/विवले/खभांवि/२०२५/ 09 दिनांक: - 3 JAN 2025

## कार्यारंभ आदेश

**प्रति,**
**मे. आय.पी. एंटरप्रायझेस,**
शॉप नं.६, शुभराय टॉवर, तळ मजला,
दत्त चौक, **सोलापूर.**
**मो. नं. ९८२२६२२९९२**

**विषय: - प्रस्तुत विद्यापीठातील विविध संकुले व प्रशासकीय विभाग यांच्याकडे असणाऱ्या शार्प कंपनीच्या झेरॉक्स/कॉपीयर मशीनच्या देखभाल व दुरुस्तीच्या कामाकरिता तीन वर्षाकरिता दरकरारामधून सेवा वेळेत देणेबाबत...**

**संदर्भ:** - १. आपले दि.२१/१२/२०२४ रोजीचे दरपत्रक.
२. दि.०३/०१/२०२५ रोजीचा दरकरार

**महोदय,**

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, संदर्भ क्रं.१ अन्वये आपली फर्म शार्प कंपनीची सोलापूर करिता अधिकृत सेवा विक्रेता असल्यामुळे प्रस्तुत विद्यापीठातील विविध संकुले व प्रशासकीय विभाग यांच्याकडे असणाऱ्या शार्प कंपनीच्या झेरॉक्स/कॉपीयर मशीनच्या देखभाल व दुरुस्तीच्या कामाकरिता आपण सादर केलेल्या दरपत्रकातील दर वाजवी असल्यामुळे खालील दिलेले दर स्विकारुन तीन वर्षाकरिता दरकरार करण्यास मा.कुलगुरु महोदय यांनी मान्यता दिलेली आहे.

| अ. क्र | कंपनीचे नाव | दर | मशीनची संख्या | एकूण वार्षिक किंमत |
|---|---|---|---|---|
| १. | शार्प प्रति मशीन (लहान) | रु.९,०००/- +GST | १२ | रु.१,०८,०००/- +GST |
| २. | शार्प प्रति मशीन (मोठे) | रु. १४,०००/- +GST | ०८ | रु.१,१२,०००/- +GST |
| ३. | Warranty Period मध्ये असलेल्या ०२ मशीन | रु. १४,०००/- +GST | ०२ | रु. ४९,५६०/- GST सहित (तीन वर्षाकरिता) |

आपण दि.०३/०१/२०२५ रोजी सुरक्षा ठेव ५% प्रमाणे रु.४२,०००/- इतकी रक्कम विद्यापीठाकडे पावती क्र.१६१५८, दि.०३/०१/२०२५ अन्वये जमा केलेली आहे. तसेच रु.५००/- च्या स्टॅम्प पेपरवर दकरार केला आहे. ***सदरचा दरकरार कालावधी दि.०३/०१/२०२५ ते ०२/०१/२०२८ असा राहील.***

प्रस्तुत विद्यापीठाकडील विविध संकुले व प्रशासकीय विभागाकडून झेरॉक्स/कॉपीयर मशीनच्या देखभाल व दुरुस्तीसाठी कळविल्यापासून पाच दिवसामध्ये विद्यापीठात येऊन प्रत्यक्ष जागेवर झेरॉक्स/कॉपीयर मशीनच्या देखभाल व दुरुस्तीचे काम संदर्भ क्र.२ येथील दरकरारातील अटी व शर्तीचे पालन करुन पूर्ण करावयाचे आहे.

3.1.25
(सीए. एम.एस. खराडे)
**वित्त व लेखा अधिकारी**

***अटी व शर्ती: -***

१. दरकरारातील अटी व शर्तीप्रमाणे सर्व मशीनची देखभाल व दुरुस्तीची कामे वेळेत करावयाची आहेत.
२. वरील तक्त्यात मंजूर केलेल्या दरामध्ये कोणत्याही परिस्थितीत वाढ मिळणार नाही.
३. दर तीन महिन्यानंतर संकुले व विभागांना दिलेल्या सेवेचा अहवाल तयार करुन तीन महिन्याच्या देयकासोबत जोडून रक्कम मागणीसाठी सादर करावा. सेवा समाधानकारक दिल्याचे दिसून आल्यानंतरच देयक आदा करण्यात येईल. अन्यथा ज्या विभागाची सेवा असमाधानकारक अथवा सेवा दिली नसल्यास असे देयक वजा करण्यात येईल.
४. देयकामधून शासन नियमाप्रमाणे प्रचलित दराने करांची कपात करण्यात येईल.
५. जमा केलेली सुरक्षा ठेव रक्कम कराच्या कालावधीमध्ये सेवा समानाकारक दिल्यानंतरच व दरकरार कालावधी संपल्यानंतर आपण मागणी केल्याप्रमाणे आदा करण्यात येईल.
६. दरकरारातील अटी व शर्ती या आदेशाचा भाग राहतील.

भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये Rs. 500

सत्यमेव जयते

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA 2024 CW 949699

दिनांक

सोलापूर अ न ०५/७०० श्री. आय. पी. एंटरप्रायझेस चा जनरल स्टॅम्प मागीतले वरून.

याना रु. चा स्टॅम्प व भरतीस

हा रुपये चा स्टॅम्प दिला.

रुपये

एस. आर. तेरनू
मुद्रांक विक्रेता, सोलापूर
परवाना क्रं. एस.आर १८ ता.२/१२/१९९८
मो. ९८२२१८६१०८

कोषागार कार्यालय सोलापूर
31 DEC 2024
मुद्रांक प्रमुख लिपीक / उपलेखापाल

हस्ते युवराज भोसले

### करारनामा

**(३ वर्षाकरीता)**

लिहून घेणारः- मा.कुलसचिव, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

**यांसी**

लिहून देणारः- आय.पी. एंटरप्रायझेस, शॉप नं.६, शुभरॉय टॉवर, तळ मजला, दत्त चौक, सोलापूर

प्रस्तुत विद्यापीठातील विविध संकुले व प्रशासकीय विभागाकडे असलेल्या एकूण २२ झेरॉक्स/कॉपीयर मशिनच्या वार्षिक दुरुस्ती व देखभाल करिता तीन वर्षाकरीता करार करण्यात आलेला आहे. विद्यापीठाच्या वतीने **मा.कुलसचिव व लिहून देणार आय.पी. एंटरप्रायझेस, सोलापूर** यांच्या दरम्यान सोलापूर येथे दि.०३/०१/२०२५ रोजी करारनामा करण्यात येत असून त्याबाबतचे अटी व शर्ती पुढीलप्रमाणे-

१. कामाचे नाव :-विद्यापीठातील विविध विभाग/संकुलाकडे असलेल्या शार्प कंपनीच्या झेरॉक्स/कॉपीयर मशिनचा वार्षिक सेवा करार **(ASC)**

२. **कराराचा कालावधी** **:-दि. ०३/०१/२०२५ ते ०२/०१/२०२८ (तीन वर्ष)**

३. वार्षिक सेवा कराराची एकूण रक्कम:-

**१. प्रति शार्प (लहान) मशिन रु. ९,०००/- + GST व प्रति मशिन (एकूण १२ मशीन)**

**२. प्रति शार्प हाय स्पीड (मोठ्या) मशिन रु. १४,०००/- + GST व प्रति मशिन (एकूण ८ मशीन व Warranty Period मध्ये असलेल्या ०२ मशीन असे एकूण २२ मशीन)**

१. एकूण १२ मशीन करिता रु. ९,०००/- प्रमाणे रु.१,२७,४४०/- प्रति वर्ष व तीन वर्षाकरिता रु. ३,८२,३२०/-

२. एकूण ०८ मशीन करिता रु. १४,०००/- प्रमाणे रु. १,३२,१६०/- प्रति वर्ष व तीन वर्षाकरिता रु. ३,९६,४८०/-

३. Warranty Period मध्ये असलेल्या दोन मशीन करिता एकूण रु. ४९,५६०/-

४. झेरॉक्स मशिन सर्व्हिसिंग प्रति माह एकूण २२ मशीनकरिता (एकूण २२ सर्व्हिसिंग प्रति मशीन)
प्रस्तुत **ASC (Annual Service Contract)** बाबत विद्यापीठाने कळविल्याप्रमाणे लिहून देणार यांनी सुरक्षा ठेव ची रक्कम रु. ४२,०००/- विद्यापीठाकडे जमा करणे बंधनकारक आहे.

५. विद्यापीठाकडून ज्या ज्या वेळी मशिन दुरुस्ती अथवा सर्व्हिसिंगसाठी लिहून देणार यांनी स्व:खर्चाने उपस्थित राहण्याचे आहे. याकरिता मान्य करण्यात आलेल्या शुल्क व्यतिरिक्त इतर शुल्क दिले जाणार नाही.

६. **दरकरार हा तीन वर्षाकरिता केलेला असला तरी प्रत्येक एक वर्षाच्या कालावधीमध्ये फर्मने दिलेली सेवा/सर्व्हिस विचारात घेऊनच पुढील दरकराराचा कालावधी सुरु ठेवण्याबाबत विचार करण्यात येईल.**

७. **फर्मने केलेल्या कामाच्या तपशीलावर (Service Report) ज्या त्या विभागाच्या सक्षम प्राधिकाऱ्याची शिक्का व स्वाक्षरी घेतल्यानंतरच देयके आदा करण्यात येईल.**

८. लिहून देणार यांनी दरकरार कालावधीमध्ये वर नमूद करण्यात आलेल्या २२ मशीनची सर्व्हिसिंग दर महिन्याच्या १ ते ७ तारखेपर्यंतच्या कालावधीत करणे बंधनकारक आहे. विहित कालावधीत सर्व्हिसिंग न झाल्यास याबाबतचे देयक आदा करणेसंबंधी निर्णय घेण्याचे अधिकार विद्यापीठास आहेत, हे लिहून देणार यांना मान्य व कबूल आहे. तसेच जर मशीनची सर्व्हिसिंग Schedule प्रमाणे प्रति माह न झाल्यास त्याचे देयक आदा केले जाणार नाही.

९. मशिनचा कोणताही पार्ट खराब झाल्यास किंवा टोनर संपल्यास तशी सुचना लिहून देणार यांनी त्या त्या विभागास करुन पुढील कार्यवाही करण्याचे आहे. कार्यालयाचे आदेशानुसार साहित्य पुरवठा करावा. सदरचे साहित्य हे शार्प कंपनीचे व किंमत ही कंपनी Price List प्रमाणे असेल.

१०. सदर मशीनची सर्व्हिसिंग करताना अथवा खराब झालेले पार्ट दुरुस्त/बदलताना मशीनला काही नुकसान झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी लिहून देणार यांची राहील व सदर नुकसान भरपाई लिहून देणार यांनी करण्याची आहे.

११. करार मुदतीत लिहून देणार यांनी कोणतेही वाढीव दर मागण्याचे नाही.

१२. प्रस्तुत कराराचा इतर फर्म सोबत पोट करार देण्याचे अधिकार लिहून देणार यांना नाहीत तसे आढळल्यास प्रस्तुत करार रद्द करण्यात येईल.

१३. प्रस्तुत कराराच्या अनुषंगाने लिहून देणार यांना कळविल्यापासून कार्यालयीन कामकाजाच्या ०५ दिवसात काम पूर्ण न केल्यास प्रति दिवस रु.१००/- प्रमाणे दंड आकारण्यात येईल तसेच सदर काम इतर फर्मकडून करुन घेतले गेल्यास त्याचा खर्च लिहून देणार यांचेकडून वसूल करण्यात येईल.

१४. वार्षिक करारपोटी एकूण खर्च रक्कमेच्या २५% रक्कम प्रत्येक दर तिमाहीकरिता अग्रीम स्वरुपात तीन महिन्यानंतर आदा करण्यात येईल.

१५. सदरील कालावधीत लिहून देणार यांच्या सेवा असमाधान कारक वाटल्यास प्रस्तुत करार रद्द करुन आवश्यक असल्यास अग्रीम रक्कम जप्त करण्याचे अधिकार मा.कुलगुरु यांना राहतील. प्रस्तुत (ASC) ची पोट मक्ता देता येणार नाही व तसे झाल्यास ते अटी व शर्तीचा भंग समजून कारवाई करण्यात येईल.

१६. उपरोक्त प्रमाणे सेवा न मिळाल्यास किंवा सेवेबाबत काही तक्रारी असल्यास लिहून देणार यांचेवर योग्य ती कारवाई करण्याचे अधिकार मा.कुलगुरु यांना राहील.

१७. वरील नमूद प्रमाणे कोणत्याही अटींची पूर्तता होत नसल्याचे निदर्शनास आल्यास अथवा लिहून देणार यांचे काम समाधानकारक न वाटल्यास सदरचे करार रद्द करुन सुरक्षा ठेव जप्त करण्याचे अधिकार मा.कुलगुरु यांना आहेत.

वरील प्रमाणे अटी व शर्ती लिहून देणार व लिहून घेणार यांना मान्य व कबूल असून त्याबाबतचा करारनामा सोलापूर न्याय कक्षेच्या अधिन राहून आज रोजी विद्यापीठात केला.

हा करारानामा केला दि.०३/०१/२०२५.

I. P. ENTERPRISES

लिहून देणार

मे. आय.पी. एंटरप्रायझेस, सोलापूर

PROPRIETOR

साक्षीदार

१. प्रशांत रा. पुजारी

२. रमेश शिंदे

लिहून घेणार

कुलसचिव

पु.अ.हो.सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

### Schedule "A"

**संकुले/विभाग निहाय झेरॉक्स मशिनची एकूण संख्या व त्याच्या दरकराराचा कालावधी दि.०३/०१/२०२५ ते ०२/०१/२०२८**

**मक्तेदाराचे नाव :- मे. आय.पी. एंटरप्रायझेस, सोलापूर**

| अ.क्र. | संकुल/विभागाचे नाव | कंपनीचे नाव | दरकरार करावयाच्या झेरॉक्स मशिनची संख्या | दरकरारानुसार प्रती वर्ष शुल्क | करार कालावधीतील सेवेचा तपशील |
|---|---|---|---|---|---|
| अ) | **AR-6031N/ AR-5618/AR-6020 (प्रति लहान मशीन रु. ९,०००/-)** | | | | |
| १. | सामाजिकशास्त्रे संकुल | Sharp Machine | ०१ | रु.९,०००/- प्रमाणे एकूण १२ मशीनकरिता प्रति वर्ष रु.१,०८,०००/- GST १८% - रु.१९,४४०/- एकूण रु. १,२७,४४०/- या प्रमाणे ३ वर्षाचे **रु.३,८२,३२०/-** | दि. ०१ ते ०७ तारखेपर्यंत विद्यापीठ विभाग/ संकुलात प्रत्यक्ष भेट देऊन मशीनची देखभाल व दुरुस्ती (Servicing) करावयाची आहे व त्याचा अहवाल प्रशासकीय विभाग / संकुले प्रमुखांना सादर करावयाचा आहे. |
| २. | भूशास्त्र संकुल | Sharp Machine | ०१ | | |
| ३. | संगणकशास्त्र संकुल | Sharp Machine | ०१ | | |
| ४. | स्पर्धा परिक्षा केंद्र | Sharp Machine | ०१ | | |
| ५. | वित्त व लेखा विभाग | Sharp Machine | ०१ | | |
| ६. | झेरॉक्स रुम | Sharp Machine | ०१ | | |
| ७. | अभियांत्रिकी विभाग | Sharp Machine | ०१ | | |
| ८. | आस्थापना विभाग | Sharp Machine | ०१ | | |
| ९. | रसायनशास्त्र संकुल | Sharp Machine | ०१ | | |
| १०. | क्रीडा व शारिरिक शिक्षण विभाग | Sharp Machine | ०१ | | |
| ११. | वाणिज्य व व्यवस्थापन संकुल | Sharp Machine | ०१ | | |
| १२. | भाषा व वाङमय संकुल | Sharp Machine | ०१ | | |
| ब) | **High Speed Machines (प्रति मोठे मशीन रु. १४,०००/-) एकूण ०८ मोठे मशीन** | | | | |
| १. | प.व मू. मं. छपाई विभाग | Sharp Machine | ०१ | एकूण रु. १४,०००/- प्रमाणे ०८ मशीनकरिता प्रति वर्ष रु.१,१२,०००/- GST १८% रु.२०,१६०/- एकूण रु. १,३२,१६०/- या प्रमाणे ३ वर्षाचे **रु.३,९६,४८०/-** | |
| २. | कौशल्य विकास केंद्र | Sharp Machine | ०१ | | |
| ३. | सभा व निवडणूक विभाग | Sharp Machine | ०१ | | |
| ४. | Examination & Evo. Exam Section | Sharp Machine | ०१ | | |
| ५. | Examination & Evo. Exam Section | Sharp Machine | ०१ | | |
| क) | **Color Machines (प्रति मोठे मशीन रु. १४,०००/-)** | | | | |
| ६. | सामाजिकशास्त्रे संकुल | Sharp Machine | ०१ | | |
| ७. | क्रीडा व शारिरीक शिक्षण विभाग | Sharp Machine | ०१ | | |
| ८. | कुलगुरु कार्यालय | कुलगुरु कार्यालय | ०१ | | |
| ड) | **This Machine are in Warranty Period एकूण ०२ मोठे मशीन** | | | | |
| ९. | शैक्षणिक संशोधन आणि विकास | Sharp Machine | ०१ Warranty Period १२/१२/२०२५ | प्रति वर्ष रु.१४,०००/- GST१८% रु. २,५२०/- एकूण रु. १६,५२०/- प्रति वर्ष याप्रमाणे दोन वर्षाचे **एकूण रु. ३३,०४०/-** (दि.०१/०१/२०२६ ते ३१/१२/२०२७ पर्यंत) | |
| १०. | इनक्युबेशन सेंटर | Sharp Machine | ०१ Warranty Period २७/१२/२०२६ | प्रति वर्ष रु. १४,०००/- GST१८% रु.२,५२०/- **एकूण रु. १६,५२०/-** (दि.०१/०१/२०२७ ते ३१/१२/२०२७ पर्यंत) | |
| | **एकूण मशिनची संख्या** | | **२२** | **एकूण खर्च रु. ८,२८,३६०/-** | |

- ड मधील अ.क्र.९ येथील मशीनचा वॉरंटी कालावधी संपल्यानंतर देखभाल दुरुस्ती दि.०१/०१/२०२६ ते ३१/१२/२०२७ असा दरकराराचा कालावधी राहील.
- ड मधील अ.क्र. १० येथील मशीनचा वॉरंटी कालावधी संपल्यानंतर देखभाल दुरुस्ती दि.०१/०१/२०२७ ते ३१/१२/२०२७ असा दरकराराचा कालावधी राहील.